डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या औरंगाबाद विभागीय केंद्राचे माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. उदयजी सामंत यांच्या हस्ते उद्घाटन

दिनांक 17 सप्टेंबर 2021 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या विभागीय केंद्राचे उद्घाटन माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. उदयजी सामंत यांच्या हस्ते 'शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद'च्या परिसरात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून होणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाची स्थापना सन 1989 मध्ये एकल विद्यापीठाच्या स्वरूपात लोणेरे येथे करण्यात आली. सन 2014 मध्ये या विद्यापीठाचा विस्तार करून त्याचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्रातील अभियांत्रिकी, औषध निर्मितीशास्त्र, वास्तुशास्त्र इ. तंत्रज्ञान विषयक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संलग्न करण्यासाठी करण्यात आली. आज मितीस विद्यापीठास एकूण 255 व्यावसायिक अभ्यासक्रम संस्था संलग्नित असून त्यामध्ये सुमारे 78 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. नजीकच्या काळात ही विद्यार्थी संख्या वाढून सुमारे दोन लाख होणार आहे.

सदर विद्यापीठाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती पाहता कामकाजाच्या सुसूत्रतेच्या दृष्टीने चार विभागीय केंद्रे मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच पाच उपकेंद्रे कोल्हापूर, सोलापूर, नांदेड, जळगाव आणि अमरावती येथे असावीत असे नियोजन विद्यापीठ कायदयानुसार करण्यात आले होते. विभागीय व उपकेंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते परीक्षा विषयक सर्व कामे जवळच्या उपकेंद्रात अचूक होणे शक्य होईल. तसेच संलग्नित संस्थांचे संलग्नीकरण याबाबत व कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील सर्व कामकाज या केंद्राद्वारे सुसूत्रपणे करता येणार आहे. याशिवाय नजीकच्या भविष्यात सदर विभागीय केंद्राच्या माध्यमातून इंडस्ट्री आणि इन्स्टिट्यूट यांच्यात भागीदारी व इतर व्यावसायिक व्यवसायाभिमुख आणि समाज उपयोगी अभ्यासक्रम व संशोधन कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. यासाठी वरिल सर्व ठिकाणी प्रत्येकी पाच एकर जागा देण्यात येणार होती. परंतु, गेली अनेक वर्षे या विभागीय केंद्राची आणि उपकेंद्रांची स्थापना जागेअभावी प्रलंबित होती.

माननीय मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. उदयजी सामंत यांच्या पाठपुराव्यामुळे उद्या औरंगाबाद येथील विभागीय कार्यालयाचे उद्घाटन प्रत्यक्षात येऊ शकत आहे. याचा थेट फायदा या विभागातील संलग्नित सुमारे 54 महाविद्यालये आणि त्यामध्ये शिकत असणारे सुमारे 7500 विद्यार्थी यांना होणार आहे. नजीकच्या काळात शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय औरंगाबाद सोबत सामंजस्य कराराच्या माध्यमातून विवीध प्रगत अभ्यास क्रम आणि संशोधन करण्यात येईल. याबद्दल औरंगाबाद विभागीय क्षेत्रातील सर्व संलग्नित महाविद्यालये आणि विद्यार्थी यांनी आनंद व्यक्त केला आहे. या विभागीय केंद्राच्या स्थापनेमुळे संलग्नित महाविद्यालय व विद्यार्थ्यांना त्यांच्या छोट्या मोठ्या कामांसाठी थेट विद्यापीठ गाठण्याची गरज भासणार नाही.

यानिमित्ताने इतर विभागीय केंद्रे आणि उपकेंद्रांच्या स्थापनेसाठी जागा, विभागीय व उपकेंद्रासाठी पदनिर्मिती व मनुष्यबळ उपलब्ध करून देणे व इतर प्रश्न लवकरात लवकर दूर करून कार्यान्वित करण्याचे आश्वासन मा. मंत्री श्री. उदयजी सामंत यांनी दिले आहे. याप्रसंगी, माननीय मुख्य सचिव तंत्र व उच्चशिक्षण श्री विकासचंद्र रस्तोगी, संचालक तंत्रशिक्षण श्री अभय वाघ, विद्यापीठाचे कुलगुरू मा. अनिरुद्ध पंडित, कुलसचिव भगवान जोगी, विद्या परिषद सदस्य, कार्यकारी परिषद सदस्य, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, परिसरातील इतर गणमान्य व्यक्ती उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनासाठी डॉ. हर्षदीप जोशी, विशेष कार्यकारी अधिकारी (), डॉ अमित शेष, डॉ. ब्रिजेश अय्यर, विशेष कार्य अधिकारी औरंगाबाद विभाग, विभागीय कार्यालय. प्रा. डॉ. उमेश कहाळेकर प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद, मा. श्री महेश शिवणकर सहसंचालक तंत्रशिक्षण विभाग, मा. श्री. नागदिवे सहाय्यक संचालक तंत्रशिक्षण विभाग, विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, प्राचार्य डॉ. अभिजीत वाडेकर प्राचार्य डॉ. निलेश पाटील तसेच विद्या परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. उल्हास शिउरकर आणि परिसरातील संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य प्रा. आर. एम. पवार, डॉ. तापडिया, डॉ. शेळके, प्रा. ढगे, प्रा. बिरादार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सदर कार्यक्रमाच्या वेळी कोविड संबंधित आवश्यक सर्व खबरदारी घेऊन व सूचनांचे पालन करून उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.